# नियमित दिवाणी दावा क्र. २६६/१९९३ मधील निशाणी २०० खालील आदेश.

(सावित्रा सपकाळ वि. पांडूरंग सपकाळ व इतर)

प्रस्तुतचा अर्ज वादी तर्फे दाव्याचा अंतीम निकाल लागेपर्यंत वादी यांना गणपत सपकाळ, मधुकर सपकाळ, रमेश सपकाळ व परेश सपकाळ यांच्याकडून वैयक्तीक खर्चासाठी व पोटापाण्यासाठी दरमहा १०,०००/- रुपये व तारखेच्या खर्चासाठी २,०००/- रुपये अंतरीम पोटगी मिळावी यासाठी सदरचा अर्ज दाखल करण्यात आलेला आहे.

## प्रस्तुत अर्जातील वादीचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे-

२. वादीने सदरचा दावा हा दावा मिळकतीचे सरसनिरस मानाने वाटप होवुन त्यातील वादीचा हिस्सा तुटक व पृथक करुन मिळावा यासाठी दाखल केलेला आहे. वादी ही ७० वर्षापेक्षा जास्त वयाची आहे. तीला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. दावा मिळकती या प्रतिवादी यांच्या ताब्यात आहेत. वादीला दावा मिळकतीतुन कोणतेही उत्पन्न मिळत नाही. वादी ही राऊतवाडी, ता. कोरेगांव येथुन जा ये करत असते. प्रत्येक तारखेस येण्या जाण्यासाठी तसेच तीच्या पोटापाण्यासाठी तीच्याकडे वैयक्तीक उत्पन्न नाही.

३. दावा मिळकती या बागायती असुन त्यास धोम धरणाचे पाणी आहे. त्यातुन प्रतिवादी ही ऊसाचे व आलेचे पिक अशी पिके घेत असतात. महादू सपकाळ हे ए. कु. मॅ. होते. त्यांच्या ताब्यातील वाडवडीलार्जीत वेलंग, ता. वाई येथील केलेल्या शेत जमीनी ऐवजी कोंढवली, लिंब येथील शेत जमीनी शासनाकडून महादू सपकाळ ए. कु. मॅ. म्हणून मिळालेले आहे. महादू याने वादीचा हिस्सा त्यांना मिळू नये म्हणून बक्षीस पत्रास गणपत सपकाळ यांच्या नावे केलेल्या दिसतात. सदर बक्षीसपत्र वादीच्यावर बंधनकारक नाही. सदरची मिळकत

गणपत व मधुकर हे वहिवाटतात.

४. माथेरान येथील मिळकती या मयत रघुनाथचा मुलगा परेश व महादूचा मुलगा रमेश वहिवाटतात. माथेरान येथील मिळकतीमध्ये सर्व कुटुंबीयांचा हक्क व अधिकार आहे. सदर मिळकती रमेश सपकाळ, महादू सपकाळ, परेश सपकाळ व रघुनाथ सपकाळ हे वहिवाटून त्यातुन उत्पन्न घेतात. कन्हेरखेड येथील मिळकत पांडूरंग यांची वैयक्तीक मालकीची आहे. सदर मिळकती कुळ वहिवाटीने स्वकष्टार्जीत मिळालेल्या आहेत. संबंधीत प्रतिवादी त्या मिळकतीतील वाटप देणेस त्यांची हरकत नाही. त्यामुळे वादीला त्यांच्याकडून पोटगी मागण्याची नाही. वादीला पोटगी न मिळाल्यास तीच्यावर उपासमारीची वेळ येणार आहे. त्यामुळे वादी यांनी प्रतिवादी गणपत सपकाळ, मधुकर सपकाळ, रमेश सपकाळ व परेश सपकाळ यांच्याकडून वैयक्तीक खर्चासाठी व पोटापाण्यास दरमहा १०,०००/– रुपये व तारखेस खर्चासाठी २,०००/– रुपये मिळावे अशी विनंती केलेली आहे.

५. प्रतिवादी क्र. ११ यांनी निशाणी २०४ वर त्यांचे सविस्तर म्हणणे दाखल केले व अर्जातील कथनांना तीव्र आक्षेप नोंदविलेला आहे. प्रतिवादींच्या मते दाव्याचे काम लांबणीवर पडावे म्हणून वादीने सदरचा अर्ज न्यायालयात दाखल केलेला आहे. वादीने दाव्यामध्ये त्यांचे मर्जीप्रमाणे दुरुस्ती करुन काम लांबणीवर टाकलेले आहे. मुळातच वादीने फक्त मधुकर यांचे वारसांकडून दरम्यानचे पोटगी मागीतलेली आहे. वादीने सोईस्कर आण्णा व पांडूरंग यांच्या वारसांकडून दरम्यानची पोटगी मागीतली नाही. यावरुन वादी यांचा प्रतिवादी यांना त्रास देण्याचा हेतु लक्षात येतो. दावा मिळकती या कन्हेरखेड येथे सुध्दा आहेत. परंतु वादीचे सख्खे दिर जे कन्हेरखेड येथील दावा मिळकती वहिवाटतात त्यांच्याकडून दरम्यानची पोटगी मागत

नाहीत. वादीने प्रस्तुतचा अर्ज दिर व त्यांची मुले यांच्याशी संगणमत करुन दाखल केलेला आहे.

६. मौजे कोंढवली लिंब येथील जमीनी बागायती नाहीत. प्रस्तुत प्रतिवादी यांचा कसाबसा चरीतार्थ सदर मिळकतीच्या उत्पन्नातुन चालतो. मुळातच कोंढवली येथील मिळकती वादीने प्रतिवादींना त्रास देण्यासाठी दाव्यामध्ये समाविष्ठ केलेल्या आहेत. कोंढवली लिंब येथील मिळकती या एकत्र कुटुंबातील नाहीत. त्या जमीनी पुर्वीच्या वाटपाप्रमाणे फक्त प्रतिवादी यांच्यात आहेत. वादी सदर मिळकतीमध्ये कोणत्याही हक्काने वाटप मागु शकत नाही. वादी सदर मिळकतीच्या आधारे दरम्यानची पोटगी मागु शकत नाही. वादीने माथेरान येथील मिळकती बाबत चुकीचा उल्लेख केलेला आहे. माथेरान येथील मिळकत सि.स.नं. ३११ अशी असुन सदर मिळकतीमध्ये प्रतिवादी केशकर्तनाचा धंदा करतात. वादींनी घर मिळकतीला शेत मिळकत समजुन रक्कम रुपये १०,०००/– अशी पोटगीची मागणी गणपत, मधुकर, रमेश व परेश यांच्याकडून चुकीच्या पध्दतीने मागीतले आहे. माथेरान येथील मिळकतीस पांडूरंग अगर आण्णा यांचा हक्क व हितसंबध नव्हता व नाही. सदर मिळकत ही प्रस्तुत वादींचे पुर्वज महादू सपकाळ यांच्या एकटयाची स्वकष्टार्जीत मिळकत आहे. त्यामुळे सदर मिळकतीवरुन दरम्यानची पोटगी मागता येणार नाही.

७. वादीने दावा करताना सर्व प्रतिवादींकडून दरम्यानचे उत्पन्न मागितले आहे. वादीला पांडूरंगच्या हिश्श्यामध्ये वाटप मागण्याचा अधिकार आहे. यदाकदाचीत वादीचा दावा मंजुर झालातर दरम्यानचे उत्पन्न पांडूरंग यांच्याकडून दाव्याच्या अंतीम निकालानंतर रितसर दरखास्त दाखल करुन मिळणार आहे. प्रतिवादीकडून दरम्यानची पोटगीची मागणी ३०

वर्षानंतर वादीस करता येणार नाही. वादीने आजारपणाबाबत खोटी विधाने केलेली आहेत. वादीला येणे जाणेचा खर्च तीला तीचे सासरे पांडूरंग यांच्याकडून मागता येईल. तरी वरील सर्व कारणांचा विचार होवुन सदरचा अर्ज नामंजुर करावा अशी विनंती प्रतिवादी क्र. ११ तर्फे करण्यात आला.

८. वादीचा अर्ज, प्रतिवादीचे म्हणणे व इतर कागदपत्रे पाहता तसेच वादी व प्रतिवादी यांचे सुविद्य विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकता खालील मुद्दे माझे विचाराधीन आहेत. त्यावरील निष्कर्ष व त्यांची कारणमिमांसा खालीलप्रमाणे.

| अ.न. | मुद्दा | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादी ही अंतरीम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय ? | होय. |
| २ | काय आदेश? | अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र. १ व २ करीता–

९. वरील मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्याने त्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी एकत्रीत चर्चीले आहेत.

१०. प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादीने सदरचा दावा हा प्रतिवादी यांच्या विरुध्द दावा मिळकतीचे सरसनिरस मानाने वाटप होवुन दावा मिळकतीतील त्यांचा हिस्सा अलग व तुटक करुन मिळावा यासाठी दाखल केलेला आहे.

प्रतिवादी क्र. १० व ११ यांनी कैफियत दाखल करुन वादींच्या कथनाला आक्षेप नोंदविलेला आहे. प्रस्तुत प्रकरण सध्या सुनावणीसाठी प्रलंबीत आहे. प्रस्तुत प्रकरणात वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये नातेसंबधाबद्दल वाद नाहीत. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादींनी त्यांच्या म्हणण्यामध्ये वादीच्या ताब्यात कोणती मिळकत असल्याचे कथन केलेले नाही. त्यामुळे वादी हिला जमीन मिळकतीतुन उत्पन्न मिळत नाही ही बाब स्पष्ट होते.

११. प्रस्तुत प्रकरणात वादीने असे कथन केले आहे की, महादू हरी सपकाळ हा कुटुंब मॅनेजर होता. त्याच्या ताब्यातील वेलंग वाई येथील शेत जमीनी ऐवजी कोंढवली लिंब येथील शेत जमीनी शासनाकडून एकत्र कुटुंबात मिळालेली आहेत. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी यांनी जमीन संपादन झाल्याचे नाकारलेले नाही. वादी यांनी दाखल केलेल्या फेरफार नं. ५८२ वरून असे दिसुन येते की, वेलंग वाई येथील मिळकतींना महादू हरी सपकाळ यांची नोंद एकत्र कुटुंब मॅनेजर म्हणून झालेली होती. सदर मिळकतीचे अधिग्रहन होवुन कोंढवली मु. पो. लिंब येथे महादू हरी सपकाळ यांना जमीन मिळाल्याचे दिसुन येते. त्यामुळे प्रथमदर्शनी वेलंग येथील मिळकतींच्या बदल्यात लिंब कोंढवली येथे महादू हरी यांना मिळकत मिळाल्याचे दिसुन येते. वेलंग येथील मिळकत एकत्र कुटुंबाची असल्यामुळे त्या बदल्यात मिळालेली मिळकत ही एकत्र कुटुंबाची असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी यांनी कथन केलेल्या वाटपा संदर्भात कोणताही प्रथमदर्शनी लेखी पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. त्यामुळे प्रथमदर्शनी प्रतिवादी यांच्या ताब्यामध्ये कोंढवली लिंब येथील वडीलोपार्जीत मिळकत असल्याचे दिसुन येते.

१२. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी यांनी असा युक्तीवाद केला की, वादी यांनी तीच्या

सख्ख्यां दिराकडून अथवा सासऱ्याकडून पोटगी न मागता चुकीच्या पध्दतीने चुलत दिरांकडून व चुलत दिरांच्या मुलांकडून पोटगी मागीतली आहे. त्यामुळे वादींचा कलुशीत हेतु सदर अर्जावरुन दिसुन येतो. त्यामुळे सदर अर्ज नामंजुर करण्याची विनंती प्रतिवादी यांच्यातर्फे करण्यात आली. प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रतिवादी क्र. १० व ११ हे वादीचे चुलत दिर आहेत. त्यामुळे वादींना चुलत दिरांकडून अथवा त्यांच्या मुलांकडून पोटगी मागता येईल का हे पाहणे आवश्यक आहे. हिंदू दत्तक व निर्वाह अधिनियम १९५६ कलम १९ मध्ये विधवा सुनेच्या निर्वाहाची तरतुद करण्यात आलेली आहे. तसेच कलम २२ मध्ये अवलंबीत व्यक्तीचा निर्वाह याची तरतुद करण्यात आलेली आहे. कलम २२(२) नुसार ज्यावेळी अवलंबीत व्यक्तीला कोणताही हिस्सा उत्तराधिकाराने मिळालेला नसेल त्यावेळी ज्यांना सदर मिळकत मिळाली असेल त्यांच्याकडून अवलंबीत व्यक्ती पोटगी मागण्यास पात्र ठरते. प्रस्तुत प्रकरणात वादी ही अवलंबीत व्यक्ती आहे. वडीलोपार्जीत मिळकती या प्रतिवादी क्र. १० व ११ यांच्या ताब्यात आहेत. त्यामुळे वादी ही त्यांच्याकडून पोटगी मिळण्यास पात्र आहे.

१३. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी यांनी असा युक्तीवाद केला की, वादीने दाव्यामध्ये दरम्यानच्या उत्पन्नाची मागणी केली आहे. त्यामुळे दाव्याच्या अंतीम निकालानंतर वादीला दरखास्त दाखल करुन दरम्यानचे उत्पन्न मिळणार आहे. त्यामुळे पोटगीची वादीला आवशक्ता नाही. येथे नमूद करण्यासारखी गोष्ट अशी की, दरम्यानची पोटगी व दरम्यानचे उत्पन्न या दोन संज्ञा वेगवेगळया आहेत. त्या संदर्भातील कायदेशीर तरतुदी ही वेगवेगळया आहेत. केवळ अर्जदाराला दरम्यानचे उत्पन्न मिळणार आहे. यावरुन अर्जदाराला दरम्यानची पोटगी मागता

येणार नाही या युक्तीवादामध्ये तथ्य दिसुन येत नाही.

१४. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी यांनी पुढे असा युक्तीवाद केला की, वादींनी तीचे सख्खे दिर यांच्याकडून पोटगीची मागणी केलेली नाही. त्यामुळे सदर अर्ज हा मंजुर होण्यास पात्र नाही. येथे नमूद करण्यासारखी गोष्ट अशी की, पोटगी हा कायद्याने दिलेला अधिकार आहे. तो कोणा विरुध्द मागायचा हे सर्वस्वी ज्याला अधिकार दिलेला आहे त्याने ठरविले पाहीजे. प्रस्तुत प्रकरणात केवळ वादीने तीच्या सख्ख्या दिरांकडून पोटगी मागीतली नाही. त्यामुळे ती प्रतिवादी क्र. १० व ११ यांच्याकडून पोटगी मागु शकत नाही असा अनुमान काढणे योग्य व संयुक्तीक ठरत नाही. त्यामुळे प्रतिवादींच्या वरील युक्तीवादामध्ये तथ्य दिसुन येत नाही.

१५. एकंदरीत, कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादी ही विधवा आहे. तीला तीच्या चरिर्थासाठी व न्यायालयीन कामकाजासाठी पोटगीची आवशक्ता आहे. प्रतिवादींनी वादीकडे उत्पन्नाचे साधन असल्याचे कथन केलेले नाही. तसेच वादीच्या ताब्यामध्ये कोणतीही मिळकत असल्याचेही दाखल कागदपत्रावरुन दिसुन येत नाही. याउलट प्रतिवादी क्र. १० व ११ यांच्या ताब्यामध्ये वडीलोपार्जीत मिळकती असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. त्यातुन वादीला तीच्या चरिर्थातासाठी अंतरीम पोटगी देणे योग्य व संयुक्तीक ठरते. त्यामुळे प्रतिवादी क्र. १० व ११ यांनी वादी हिला दरम्यानची पोटगी म्हणून १५००/– (दिड हजार रुपये फक्त) देण्याचे आदेश पारीत करणे योग्य व संयुक्तीक होईल. सबब मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदवितो व मुद्दा क्र. २ करीता खालील आदेश पारीत करतो.

# <u>आदेश</u>

प्रतिवादी क्र. १० व ११ यांनी वादींना निशाणी २०० वरील अर्जाच्या तारखेपासुन दाव्याचा अंतीम निकाल लागेपर्यंत एकत्रीत दरमहा रक्कम रुपये १५००/- (दिड हजार रुपये फक्त) द्यावी असा आदेश पारीत करण्यात येतो.

Digitally signed by ATUL BHIMRAO PATIL
Date: 2023.04.05 12:50:36 +0530

कोरेगाव.

दि. २८/०३/२०२३

दिवाणी न्यायाधीश क. स्तर कोरेगाव.